Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक १५] गुरुवार ते बुधवार, एप्रिल ९-१५, २०२०/चैत्र २०-२६, शके १९४२ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–७ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८५.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, यांजकडून**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश**

क्रमांक गृहशाखा-डेस्क १२-कावि-२७९-२०२०.––

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १३ मार्च, २०२० च्या अधिसूचनान्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उद्‌भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उद्‌भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्ह्यात कोरोना विषाणुच्या (COVID-19) प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार जिल्ह्यातील नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यामध्ये सभा, मेळावे, उपोषण, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मीक, क्रीडा विषयक कार्यक्रमांना बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच नगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्रातील सर्व रेस्टॉरंट व बार, खानावळ, ढाबा, यांची सायंकाळची बंद करण्याची वेळ कमी करुन सायं. ८.०० वाजता बंद होणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याचीही माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४(१) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, एम. देवेंदर सिंह, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ असे आदेशित करीत आहे की, जिल्ह्यातील नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यामध्ये सभा, मेळावे, उपोषण, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय, धार्मीक, क्रीडा विषयक कार्यक्रमांना पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात येत आहे. तसेच नगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्रातील सर्व रेस्टॉरंट व बार, खानावळ, ढाबा, यांची सायंकाळची बंद करण्याची वेळ कमी करुन सायं. ८.०० वा. बंद करण्याबाबत आदेशित करीत आहे.

सदर आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीसांनी जाहीर करुन त्यास प्रसिद्धी करावी असेही आदेशित करीत आहे.

हा आदेश यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्राकरीता दिनांक १६ मार्च २०२० पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

हा आदेश आज दिनांक १६ मार्च २०२० रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आला आहे.

**एम. देवेंदर सिंह,**
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ,

यवतमाळ :
दिनांक १६ मार्च, २०२०.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८६.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ :—**पोलीस अधीक्षक, वाशीम यांचे कार्यालयीन पत्र क्र. जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-२०२०-८३१, दिनांक १७ फेब्रुवारी २०२०.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये आदेश लागू करणेबाबत**

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-१८७-२०२०.—

ज्याअर्थी, वाशीम जिल्ह्यात दिनांक १८-२-२०२० रोजी पासून HSC (उच्च माध्यमिक) परिक्षेस सुरुवात झाली असून दिनांक ०१-३-२०२० रोजी S.S.C. (माध्यमिक शालांत) परिक्षेस सुरुवात होणार आहे. तसेच वाशीम जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनाच्या प्रतिक्रीया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशीम जिल्ह्यात सद्यस्थितीत राष्ट्रीय नोंदणी अधिनियम, NRC नागरीकत्व दुरुस्ती अधिनियम, CAA समर्थनार्थ व निषेधार्थ विविध आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते आहे. तसेच धनगर आरक्षण, मुस्लीम आरक्षण मागणीसाठी सुद्धा आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शेतकरी कर्जमाफी, वाढती महागाई तसेच तुरीचे व हरभ-याचे थकीत चुकारे (पैसे) ईत्यादी मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने सतत मोर्चे, धरणे, आमरण उपोषणे, आत्मदहन, रास्ता रोको ईत्यादी प्रकारचे आंदोलने होत आहेत. अशा परिस्थीतीत जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे यासाठी कलम ३७ (१) (३) मुं. पो. ॲक्ट नुसार प्रतिबंधात्क आदेश लागू करणे अत्यंत आवश्यक आहे. तरी उपरोक्त काळात जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये आणि शांतता व सुव्यवस्था कायम राहावी या करीता दिनांक २२-०२-२०२० रोजीचे ००.०१ पासून ते दिनांक ७-०३-२०२० रोजीचे २४.०० वाजे पर्यंत संपूर्ण वाशीम जिल्ह्यात कलम ३७(१) (३) मुं. पो. ॲक्ट नुसार प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होण्यास मा. पोलीस अधिक्षक वाशीम यांनी संदर्भिय पत्रान्वये विनंती केली आहे.

त्याअथी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी, दीपक कुमार मीना, जिल्हादंडाधिकारी, वाशीम उक्त आदेशाच्या अधीन राहून, मुं. पो. ॲक्ट लागू करण्याचे आदेश पारित करित आहे. सदर आदेश लागू झाल्याच्या दिनांकापासून संपूर्ण वाशीम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरिता मनाई करण्यात आली आहे.

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

२. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

३. दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधणे जवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

४. व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

५. वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे, अशा प्राधीकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितिमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/ वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकांमध्ये प्रसार/प्रचार करणे.

मी असेही जाहीर करतो की, उपरोक्त प्रतिबंधात्मक आदेश खालील बाबींकरिता लागू राहणार नाहीत.

१. अंत्ययात्रा

२. धार्मिक विधी/धार्मिक मिरवणूक/लग्नविधी सोहळा/सामाजिक सण इ.

३. शासकीय सेवेत तैनात कर्मचारी

४. सार्वजनिक करमणुकीची सिनेमागृहे/रंगमंच ईत्यादी

५. विभिन्न भागामध्ये निश्चित दिवस ठरवून दिलेले आठवडी बाजार

उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये संपूर्ण वाशीम जिल्ह्यामध्ये दिनांक २६-०२-२०२० रोजीचे ००.०१ वाजता पासून ते दिनांक ७-०३-२०२० रोजीचे २४.०० वाजेपर्यंत कार्यान्वित राहतील.

उपविभागीय दंडाधिकारी, वाशीम/मंगरुळपीर/कारंजा यांना उपरोक्त आदेशामधून समोचित प्रकरणामध्ये त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये स्थानीक पोलीस अधिका-यांशी सल्लामसलत करुन सूट देण्याचे अधिकार याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत. प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणतेही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहेत. तसेच आवश्यक वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

वाशीम :
दिनांक २५ फेब्रुवारी २०२०.

**दीपक कुमार मीना,**
जिल्हादंडाधिकारी, वाशीम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८७.

**संदर्भ :—**पोलीस अधीक्षक, वाशीम यांचे कार्यालयीन पत्र क्र. जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-२०२०-८३१, दिनांक १७ फेब्रुवारी २०२०.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये आदेश लागू करणेबाबत**

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-२१०-२०२०.—

ज्याअर्थी, वाशीम जिल्ह्यात दिनांक १८-२-२०२० रोजी पासून HSC (उच्च माध्यमिक) व दिनांक ०३-३-२०२० रोजी S.S.C. (माध्यमिक शालांत) परिक्षेस सुरुवात झालेली असून दिनांक ०९-०३-२०२० रोजी होळी, दिनांक १०-०३-२०२० रोजी धुलिवंदन तसेच दिनांक १२-०३-२०२० रोजी शिवजयंती (तिथीनुसार) जिल्ह्यात विविध ठिकाणी मिरवणुकांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील असून

जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनाच्या प्रतिक्रीया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्ह्यात सद्यस्थितीत राष्ट्रीय नोंदणी अधिनियम NRC नागरीतत्व दुरुस्ती अधिनियम CAA समर्थनार्थ व निषेधार्थ विविध आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच धनगर आरक्षण, मुस्लीम आरक्षण मागणीसाठी सुद्धा आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शेतकरी कर्जमाफी, वाढती महागाई तसेच तुरीचे व हरभ-याचे थकीत चुकारे (पैसे) ईत्यादी मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने सतत मोर्चे, धरणे, आमरण उपोषणे, आत्मदहन, रास्ता रोको ईत्यादी प्रकारचे आंदोलने होत आहेत. करीता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये आणि शांतता व सुव्यवस्था कायम राहावी, या करीता दिनांक ८-०३-२०२० रोजीचे ००.०१ पासून ते दिनांक २२-०३-२०२० रोजीचे २४.०० वाजे पर्यंत कलम ३७ (१) (३) मु. पो. ॲक्ट नुसार प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होण्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांनी संदर्भिय पत्रान्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी, हृषीकेश मोडक, जिल्हादंडाधिकारी, वाशिम उक्त आदेशाच्या अधीन राहून, मुं. पो. ॲक्ट लागू करण्याचे आदेश पारित करित आहे. सदर आदेश लागू झाल्याच्या दिनांकापासून संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरिता मनाई करण्यात आली आहे.

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

२. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

३. दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधणे जवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

४. व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

५. वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे, अशा प्राधीकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितिमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आनणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/ वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकामध्ये प्रसार/प्रचार करणे.

मी असेही जाहीर करतो की, उपरोक्त प्रतिबंधात्मक आदेश खालील बाबींकरिता लागू राहणार नाहीत.

१. अंत्ययात्रा

२. धार्मिकविधी/धार्मिक मिरवणूक/लग्नविधी सोहळा/सामाजिक सण इ.

३. शासकीय सेवेत तैनात कर्मचारी

४. सार्वजनिक करमणुकीची सिनेमागृहे/रंगमंच ईत्यादी

५. विभिन्न भागामध्ये निश्चित दिवस ठरवून दिलेले आठवडी बाजार

उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक ०८-०३-२०२० रोजीचे ००.०१ वाजता पासून ते दिनांक २२-०३-२०२० रोजीचे २४.०० वाजेपर्यंत कार्यान्वित राहतील.

उपविभागीय दंडाधिकारी, वाशिम/मंगरुळपीर/कारंजा यांना उपरोक्त आदेशामधून समोचित प्रकरणामध्ये त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये स्थानीक पोलीस अधिका-यांशी सल्लामसलत करुन सूट देण्याचे अधिकार याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत. प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणतेही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहेत. तसेच आवश्यक वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

वाशीम :
दिनांक ३ मार्च २०२०.

**हृषीकेश मोडक,**
जिल्हादंडाधिकारी, वाशिम.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८८.

## अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ :–**पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांचे पत्र क्र. जिविशा-७३९-२०२०, दिनांक २५ फेब्रुवारी २०२०.

### आदेश

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-१३८-२०२०.––

उपरोक्त संदर्भान्वये अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये शेतकरी संघटनातर्फे शेतकरी कर्जमाफी, शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने, बोंड अळी, कर्जमाफी संदर्भातील शासनाचा परिपत्रकाची होळी करुन शासन धोरणाच्या विरोधात शेतक-यांचे आंदोलने सुरु आहेत.

दिनांक २४-०२-२०२० रोजी पासून सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक आचार संहिता लागू झालेली आहे. तसेच ग्रामपंचायत निवडणुकीकरिता दिनांक २९-०३-२०२० रोजी मतदान व दिनांक ३०-०३-२०२० रोजी मतमोजणी होणार आहे. दिनांक ०९-०३-२०२० रोजी होळी व दिनांक १०-०३-२०२० रोजी धुलीवंदन सन मोठ्या प्रमाणत साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे दिनांक १२-०३-२०२० रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त्य जिल्ह्यात ठिकठिकाणी मिरवणूक, शोभायात्रा काढण्यात येतात. तसेच एनआरसी व सिएए कायद्याचे विरोधात व समर्थनात मोर्चे/प्रदर्शने करण्यात येत आहे. विदर्भ राज्य वेगळे होण्याकरिता सुद्धा आंदोलने व बंद पुकारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून होणा-या तुर/हरबरा खरेदी व पैसे वाटप विलंबन, विरोधात आपल्या मागण्याकरिता विरोधी पक्ष शासनाविरोधात मोर्चे, धरणे, ठिय्या, रास्ता रोको इत्यादी आंदोलन करत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्ह्यामध्ये इतर राजकीय पक्ष व जनतेकडून आंदोलन, मोर्चे, धरणे, निदर्शने इत्यादी करण्यात येत आहेत. महागाई, घरगुती गॅस दरवाढ, विद्युत भारनियमन, शेतकरी आत्महत्या, महागाई, प्रकल्प/भूमीअधीग्रहन तसेच स्थानिक पक्ष व इतर पक्षांकडून व संघटनांकडून उपोषण/आंदोलने करण्यात येतात.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरुन वाद निर्माण करुन तसेच स्थानिक नागरीकांकडून व राजकीय पक्ष संघटनाकडून वेळो वेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्या करीता आंदोलने करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वरील बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत रहावी याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दिनांक २७-०२-२०२० चे ००.१ वा. पासून ते दिनांक १२-०३-२०२० चे २४.०० वा. पर्यंत लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत रहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, डॉ. नितिन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार मुंबई पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

### अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (१)

१. शस्त्र तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जीवीत हानी होवू शकते असे शस्त्र.

२. विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतुक करणे.

३. दगड, विटा, इ. क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे)

४. माणसाच्या/जमावाच्या एकत्रीकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

५. जाहीररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभीस्त चाळे करणे, अंगविक्षेप करणे. चित्र विचीत्र कृती करणे, बदनामीकारक बोलणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

### अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (३)

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजीत करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या मुं. पो. का. च्या कलम ३७ (२) अन्वये जारी केलेल्या आदेश दिनांक २७-०२-२०२० चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १२-०३-२०२० चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७(१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लंघनाबाबत मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशिर कारवाई करीता मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरीक्त कोणत्याही मिरवणुका/कोणत्याही रस्ता/ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २६ फेब्रुवारी २०२० रोजी जारी केले.

दिनांक २६ फेब्रुवारी २०२०.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८९.

**संदर्भ :–**पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांचे पत्र क्र. जिविशा-८४५-२०२०, दिनांक ०४ मार्च २०२०.

**आदेश**

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-१७३-२०२०.—

उपरोक्त संदर्भान्वये अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये शेतकरी संघटनातर्फे शेतकरी कर्जमाफी, शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने, बोंड अळी, कर्जमाफी संदर्भातील शासनाचा परिपत्रकाची होळी करुन शासन धोरणाच्या विरोधात शेतक-यांचे आंदोलने सुरु आहेत.

दिनांक २४-०२-२०२० रोजी पासून सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक आचार संहिता लागू झालेली आहे. तसेच ग्रामपंचायत निवडणुकीकरिता दिनांक २९-०३-२०२० रोजी मतदान व दिनांक ३०-०३-२०२० रोजी मतमोजणी होणार आहे. दिनांक २५-०३-२०२० रोजी गुडीपाडवा सन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी यात्रा भरविण्यात येतात. त्याचप्रमाणे मराठी नव वर्ष निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे पथसंचलनाचे आयोजन करण्यात येते. तसेच एनआरसी व सिएए कायद्याचे विरोधात व समर्थनात मोर्चे/प्रदर्शने करण्यात येत आहे. विदर्भ राज्य वेगळे होण्याकरिता सुद्धा आंदोलने व बंद पुकारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून होणा-या तुर/हरबरा खरेदी व पैसे वाटप विलंबन, विरोधात आपल्या मागण्याकरिता विरोधी पक्ष शासनाविरोधात मोर्चे, धरणे, ठिय्या, रास्ता रोको इत्यादी आंदोलन करत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्ह्यामध्ये इतर राजकीय पक्ष व जनतेकडून आंदोलन, मोर्चे, धरणे, निदर्शने इत्यादी करण्यात येत आहेत. महागाई, घरगुती गॅस दरवाढ, विद्युत भारनियमन, शेतकरी आत्महत्या, महागाई, प्रकल्प/भूमीअधीग्रहन तसेच स्थानिक पक्ष व इतर पक्षांकडून व संघटनांकडून उपोषण/आंदोलने करण्यात येतात.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरुन वाद निर्माण करुन तसेच स्थानिक नागरीकांकडून व राजकीय पक्ष संघटनाकडून वेळो वेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्या करीता आंदोलने करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वरील बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत रहावी याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दिनांक १२-०३-२०२० चे ००.१ वा. पासून ते दिनांक २७-०३-२०२० चे २४.०० वा. पर्यंत लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत रहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, डॉ. नितिन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार मुंबई पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (१)**

१. शस्त्र तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जीवीत हानी होवू शकते असे शस्त्र.

२. विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतुक करणे.

३. दगड, विटा, इ. क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे)

४. माणसाच्या/जमावाच्या एकत्रीकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

५. जाहीररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभीस्त चाळे करणे, अंगविक्षेप करणे. चित्र विचीत्र कृती करणे, बदनामीकारक बोलणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजीत करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या मुं. पो. का. च्या कलम ३७ (२) अन्वये जारी केलेल्या आदेश दिनांक १३-०३-२०२० चे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७-०३-२०२० चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागत लागू राहील.

उपरोक्त कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लंघनाबाबत मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशिर कारवाई करीता मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरीक्त कोणत्याही मिरवणुका/कोणत्याही रस्ता/ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ०६ मार्च २०२० रोजी जारी केले.

अमरावती :
दिनांक ६ मार्च २०२०.

**डॉ. नितीन व्यवहारे,**
अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.